**१३/३/२३**

## विषय: विकासकांच्या सादरीकरणाला आमंत्रित सदस्यां ना विषयाची माहिती देण्यासाठी झालेली सभा.

दि. १४ आणि १५ तारखे ला आयोजित सात विकासकांच्या सादरीकरणास आमंत्रित १७ सोसायटी सभासद आणि पंच समिती सदस्यांची एक मीटिंग दिनांक १२/३/२३ रोजी संस्थेच्या सभागृहात आयोजित केली गेली. ह्यात आमंत्रित श्री वैशाळ नाईक सोडून बाकी सगळे १६ आमंत्रित सभासद तसेच सर्व पंच समिती सदस्य उपस्थित होते. अध्यक्ष स्थानी श्री विजय सावंत होते.

सर्व प्रथम श्री सावंत यांनी ह्या सभे चे उदिष्ट तसेच आमंत्रित सभासदांची निवड कुठल्या निकषान वर झाली ते ही सांगितले. श्री नेवाळकर यांनी विकसक निवडी ची आत्ता पर्यंत झालेली वाटचाल आणि आमंत्रित सभासदान कडून १४ आणि १५ तारखे ला होणाऱ्या ७ विकसकांच्या सादरीकरणा नंतर त्यातून सर्वोत्तम ३ विकसक निवडी ची प्रक्रिया कशी असणार, दिलेल्या वेळे चे महत्व, प्रश्न विचारण्याची सिस्टीम सारख्या बाबींचा खुलासा केला. दोन्ही दिवशी सभासदांची उपस्थिती कां अनिवार्य आहे ते सचिव श्री पटवर्धन ह्यांनी सांगितले.

ह्या नंतर झालेल्या प्रश्नोत्तर सेशन मधे श्री वसंत जोगदेव, श्री श्री वर्धन गाडगीळ, श्री गणेश शिरोडे, श्री अरविंद करंदीकर, श्री महेश प्रभुदेसाई, सौ. रंजना माकोडे, श्री शशांक गोखले, श्री रोहन मोरे यांनी काही प्रश्न विचारले ज्याला पंच समिती चे सचिव श्री विनायक पटवर्धन, श्री प्रदीप नेवाळकर, श्री अनंत शाळिग्राम आणि श्री विजय सावंत ह्यांनी उत्तरं दिली.

श्री गाडगीळ यांनी आमंत्रित सभासदांना त्यांचे assessment करण्या साठी थोडा वेळ देण्याची मागणी केली. त्यावर सचिवांनी २० मार्च ला मीटिंग घेऊन त्यात सर्व सभासदांनी त्यांचे assessment केलेले फॉर्म्स सचिवांकडे द्यावेत असे ठरवले.

१४ तारखे ला सर्वांनी PYC इथे वेळेवर पोचण्याची सूचना करून अध्यक्षांनी सभा संपल्याचे घोषित केले.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती च्या वती ने**